# प्रकरण -2 (नियमपुस्तिका - 1)

## संघटनेचे कार्य, कर्तव्याबाबतचा तपशिल

# प्रकरण -2 (नियमपुस्तिका - 1)

## संघटनेचे कार्य, कर्तव्याबाबतचा तपशिल

**2.1 सरकारी प्राधिकरणाचे उद्दीष्ठ/ प्रयोजन**

बृहन्मुंबई महानगरपालिका ही अर्ध स्वायत्त संस्था आहे . नगर अभियंता विभाग हा बृहन्मुंबई महानगरपालिकेचा एक महत्वाचा विभाग असून नगर अभियंता हे त्या चे प्रमुख आहेत . नगर अभियंता यांच्याखाली काम करणा -या विभागांपैकी कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण ) कक्ष हा एक विभाग आहे. हा विभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'स्थापत्य' आणि 'यांत्रिकी व विद्युत' अभियांत्रिकी कामाकरिता कंत्राटदारांच्या नोंदणीकरणाचे आणि बेरोजगार अभियंत्यांच्या नोंदणीकरणाचे काम पहातो.

2.2 सरकारी प्राधिकरणाच्या उद्देशासंबंधी निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'स्थापत्य' आणि 'यांत्रिकी व विद्युत' अभियांत्रिकी कामाकरिता कंत्राटदारांचे नोंदणीकरण करणे आणि बेरोजगार अभियंत्यांचे नोंदणीकरण करणे.

2.3 सरकारी प्राधिकरणाचा तिच्या माहितीच्या संदर्भाने संक्षिप्त वृत्तांत

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम 61आणि 63 अनुसार महानगरपालिका आयुक्तांना आवश्यक अशी कर्तव्ये पार पाडताना महानगरपालिकेच्या वतीने कराराची अंमलबजावणी करावयाची असते , त्याकरीता कंत्राटदारांची नोंदणी करणे आवश्यक असते , जेणेकरुन महानगरपालिकेच्या बांधकाम व इतर तत्सम कामांची अंमलबजावणी करताना चांगल्या प्रकारे गुणात्मक व परिमाणात्मक नियमण करता येईल.

2.4 सरकारी प्राधिकरणाची कर्तव्ये

महापालिका आयुक्तांनी कंत्राटदारांच्या नोंदणीकरणा साठी नोंदणीकरण छाननी समितीची ('स्थापत्य' अभियांत्रिकी संवर्गातील वर्ग I(ब) ते IX व 'यांत्रिकी व विद्युत' अभियांत्रिकी संवर्गातील वर्ग ब ते ई) आणि सक्षम अधिकार्यांची ('स्थापत्य' अभियांत्रिकी संवर्गातील वर्ग I(अ) करिता नगर अभियंता व 'यांत्रिकी व विद्युत' अभियांत्रिकी संवर्गातील वर्ग अ करिता प्रमुख अभियंता (यां. व वि.)) यांची खालील इतर संलग्न कार्ये पार पाडण्यासाठी नियुक्ती केलेली आहे.

अ) कंत्राटदारांची नोंदणी नियमावली -2016 नुसार करणे

ब) कंत्राटदारांच्या नोंदणीचे नुतनीकरण करणे

क) कंत्राटदारांच्या नोंदणीची श्रेणीवाढ करणे

ड) वेळोवेळी “स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत अभियांत्रिकी कामाकरिता कंत्राटदारांच्या नोंदणीकरणाची नियमावली – 2016” मध्ये आवश्यकतेप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करण्यासाठी प्रस्ताव तयार करणे.

इ) बेरोजगार अभियंत्यांचे नोंदणीकरण करणे.

2.5 सरकारी प्राधिकरणाची महत्वाची कार्ये / कर्तव्ये

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ‘स्थापत्य’ आणि ‘यांत्रिकी व विद्युत’ अभियांत्रिकी कामाकरिता कंत्राटदारांच्या नोंदणीकरणाचे प्रस्ताव तयार करणे, नोंदणीकृत कंत्राटदारांच्या नोंदणीचे नूतनीकरण करणे, नोंदणीकृत कंत्राटदारांची श्रेणीवाढ करणे हे (संनियंत्रण आणि नोंदणीकरण) कक्षाचे मुख्य कार्य / कर्तव्य आहे.

2.6 सरकारी प्राधिकरणाद्वारे पुरविल्या जाणा-या सुविधांची संक्षिप्त माहितीसह यादी

नगर अभियंता यांच्या नियंत्रणाखाली आणि कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण) कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली नोंदणीकरण कक्षाकडून ज्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेचे नोंदणीकृत कंत्राटदार म्हणून नाव नोंदवायचे आहे अशा आवेदकांना नूतन नोंदणीकरणाबाबतची अद्ययावत माहिती दिली जाते आणि त्याकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्राची यादी पूरविली जाते.

2.7 संघटनेचे विविध पातळीनुसार रेखाचित्र, जसे राज्य, संचालनालय, प्रदेश, जिल्हा, गट इत्यादी (जे लागू असेल ते)

नगर अभियंता

↓

कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण) कक्ष

↓ ↓

सहायक अभियंता (सं. व नों.) स्थापत्य(03) सहायक अभियंता (सं. व नों.) यांत्रिकी व विद्युत (01)

↓ ↓

दुय्यम अभियंता (सं. व नों.) स्थापत्य (04) दुय्यम अभियंता (सं. व नों.) यांत्रिकी व विद्युत (01)

↓ ↓

मुख्य लिपिक

↓

लिपिक (02)

↓

टंकलेखक

↓

शिपाई (02)

2.8 सरकारी प्राधिकरणा ची परिणामकारकता आणि कार्यक्षमता वाढविण्याकरीता जनतेकडून असलेली अपेक्षा.

लागू नाही.

2.9 जनतेचा सहभाग/ योगदान मिळवण्यासाठी केलेली व्यवस्था / पध्दती

लागू नाही

2.10 सेवा पुरवठा आणि जनतेची गा -हाण्यावरील निर्णयांचे संनियंत्रण करण्यासाठी उपलब्ध असलेली यंत्रणा.

जनतेला काही माहिती हवी असल्यास ती कार्यकारी अभियंता (संनियंत्रण व नोंदणीकरण ) कक्ष यांच्या कार्यालयात खालील पत्त्यावर उपलब्ध आहे.

कार्यकारी अभियंता
(संनियंत्रण आणि नोंदणीकरण) कक्ष यांचे कार्यालय
जे.बी.शहा.म्युनिसिपल मार्केट इमारत, पहिला मजला,
युसुफ मेहेर अली रोड, मस्जिद रेल्वेस्टेशन जवळ,
मस्जिद (प.), मुंबई:400 009
दूरध्वनी क्रमांक : 022 23403644